स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव महाराष्ट्र वन विभाग

दूरध्वनीक्र.022-25220097

EmailId:dfommcu@gmail.com

महाराष्ट्र शासन
वनविभाग
**विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक**
**यांचे कार्यालय**
ब- ६८, कामगार नगर, टिळकनगर स्टेशन जवळ, कुर्ला (पुर्व), मुंबई - ४०० ०२४

जा.क्र.कक्ष-9/जमिन/2153/सन 2022-23

दिनांक.23/11/2022.

प्रति,

सदस्य सचिव,
राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती,
तथा उप वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई.

**विषय** : केशवसृष्टी संस्थेव्दारे प्राप्त तक्रारीबाबत. (तक्रार क्र.186)

**संदर्भ** : 1. आपलेकडील पत्र क्र.ल.ले/समिती/31, दिनांक.12/05/2022.
2. आपलेकडील पत्र क्र.ल.ले/समिती/76, दिनांक.22/07/2022.
3. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,कांदळवन कक्ष,मुंबई, यांचेकडील पत्र क्र. अप्रमुवस/कक्ष-3/सर्वे/2277, दिनांक.04/03/2022.
4. वनक्षेत्रपाल ठाणे (कांदळवन) यांच्याकडील पत्र क्र. ठा.कां/तक्रार/521, दिनांक.07/10/2022.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 1,2 व 3 अन्वये श्री. विनय नत्थाणी, केशवसृष्टी संस्था यांनी गाव उत्तन ता.जि. ठाणे सर्व्हे क्र. 184/ड, 188/ब आणि 190/ब या जमिनीवरील कांदळवन नष्ट करुन अवैधपणे बांधलेला सिमेंटचा रस्ता तात्काळ निष्कासित करुन संबंधीतांवर कादेशीर कारवाई करणेबाबतचा तक्रार अर्ज आपल्यामार्फत या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. त्याअनुषंगाने वनक्षेत्रपाल ठाणे (कांदळवन) यांनी नमूद जागेची स्थळपाहणी करून संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

1. सदरचे ठिकाण हे गाव उत्तन ता.जि. ठाणे सर्व्हे क्र. 184/ड, 188/ब आणि 190/ब येथील आहे.
2. तक्रारीमधील नमुद क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र नाही.
3. तक्रारीमधील नमुद क्षेत्र हे बफर झोन मध्ये येत आहे.
4. तक्रारीमधील नमुद क्षेत्र हे खाजगी कांदळवन आहे.
5. प्रत्यक्ष स्थळपाहणीच्या वेळी प्रत्यक्ष जागेवर घेतलेले जी.पी.एस. रिडींग खालीलप्रमाणे
   1. N 19 15 48 E 72 48 4  2. N 19 15 50 E 72 48 3
6. वरील जी.पी.एस. रिडींग गुगल अर्थवर घेऊन MRSAC नकाशावर सुपर इंम्पोज करुन तपासले असता सन 2005 साली नमूद जागेवर तुरळक प्रमाणात काही ठिकाणी कांदळवन दिसून येत आहे.
7. तसेच सद्यस्थितीत नमूद जागेवर मौजे उत्तन स.क्र. 184 (ड), 188/ब मध्ये काही क्षेत्रावर कांदळवनाचे व कांदळवन सहयोगी झाडे दिसून आले व कांदळवनाचा ऱ्हास करुन सिमेंटचा पक्का रस्ता बनविल्याचे दिसून आले.
8. त्याअनुषंगाने वनक्षेत्रपाल ठाणे (कांदळवन) यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्र. तक्रार/496, दिनांक.30/09/2022 अन्वये तहसिलदार, मिरा- भाईंदर यांना कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे. सोबत छायांकित प्रत अवलोकनार्थ जोडली आहे. तरी या विभागाकडील सदरची तक्रार निकाली काढण्यात यावी, हि विनंती.

Survey/Committee

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई**
**आवक क्र. : 2900 दिनांक : 24/11/22.**
**मुख्य लेखापाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक**

25/11

(एम.आदर्श रेड्डी)
विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संधारण घटक

प्रतिलिपी – मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,कांदळवन कक्ष,मुंबई यांना संदर्भ क्र. 3 अन्वये माहितीसाठी सविनय सादर.
प्रतिलिपी – सहाय्यक वनसंरक्षक, कांदळवन संरक्षण, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

वनपरिक्षेत्र अधिकारी, ठाणे (कांदळवन), मुंबई कांदळवन संधारण घटक, यांचे कार्यालय
वनराज सोसा.शेजारी,फॉरेस्ट कॉलनी, हरी ओम नगर रोड,कोपरी, ठाणे (पुर्व)- 400 603
Email:rfommcubhiwandi@gmail.com

विषय:-मिरा-भाईंदर क्षेत्रात होणाऱ्या तक्रारींबाबत.
जा.क्र. ठा.कां/जमिन/496/सन 2022-23
ठाणे ,400603 दि. 30/09/2022

प्रति,

मा. तहसिलदार,मिरा-भाईंदर,
मिरा-भाईंदर

संदर्भ-1. श्री. स्वप्नील जी. पाटील यांनी केलेल्या दिनांक 12/10/2020 रोजीची तक्रार.
2. केशवसृष्टी संस्थेद्वारे यांनी केलेली दिनांक 26/02/2022 रोजीची तक्रार.
3. श्री. धिरज परब यांनी केलेली भाईंदर प. राधास्वामी सत्संग येथील कांदळवन –हासाबाबत केलेली तक्रार.

उपरोक्त संदर्भ क्र. 1 अन्वये श्री. स्वप्नील जी. पाटील यांनी साई दत्तनिवास, शिवशक्ती नगर, संत निरंकारी भवन, नवघर येथे सी.आर.झेड क्षेत्रात 5000 ते 6000 चौ.फुट अनाधिकृत बांधकाम व पत्र्याचे शेड, मातीचा भराव करून कांदळवन झाडांची तसेच जैविक झाडांची नासधुस केल्याबाबतची तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली आहे. सदर तक्रार प्राप्त क्षेत्र राखीव कांदळवन क्षेत्र नाही. परंतु सदर ठिकाणी सन 2005 साली दलदल व पाणथळ जागा असल्याचे दिसून येत आहे. तसेच सदर ठिकाणी तुरळक प्रमाणात कांदळवन आहे. सद्यस्थितीत सदर ठिकाणी मातीची भरणी केली असून बंगल्याच्या पाठीमागील बाजुस भिंतीलगत कांदळवनाची झाडे आहेत.

संदर्भ क्र. 2 अन्वये केशवसृष्टीच्या संस्थेच्या मालकीच्या जमिनीतील कांदळवने नष्ट करून अवैधपणे बांधलेल्या सिमेंटचा रस्ता तत्काळ निष्कासित करून संबंधित व्यक्तिवर/ विकासकावर गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्याबाबतची तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली आहे. सदर क्षेत्र अधिसुचित राखीव कांदळवन क्षेत्र नाही. सदर तक्रारीतील नमुद जागेवर 2005 साली तुरळक प्रमाणात काही ठिकाणी कांदळवन दिसून येत आहे. तसेच सद्यस्थितीत मौजे उत्तन स.क्र. 184 (ड), 188 (ब) मध्ये केशवसृष्टी या संस्थेच्या काही क्षेत्रावर कांदळवनाचे व कांदळवन सहयोगी झाडे दिसून आली व कांदळनाचा ऱ्हास करुन सिमेंटचा पक्का रस्ता बनविल्याचे दिसून आले.

संदर्भ क्र. 3 अन्वये श्री. धिरज परब यांनी केलेली भाईंदर प. राधास्वामी सत्संग येथील कांदळवन –हासाबाबत केलेली तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली आहे. सदर क्षेत्र सदर क्षेत्र अधिसुचित राखीव कांदळवन क्षेत्र नाही. सदर तक्रारीतील नमुद जागेवर 2005 साली कांदळवन नाही. परंतु सद्यस्थितीत सदर ठिकाणी कांदळवन दिसून येत आहे. तसेच सदर जागेवर डेब्रीज टाकुन सपाटीकरण करून वाहन पार्किंग करीता त्या जागेचा वापर करत असल्याचे दिसून येत आहे.

तरी आपल्या माहितीसाठी व पुढील उचित कार्यवाहीसाठी सविनय सादर.

(विक्रांत वामन खाडे)
वनपरिक्षेत्र अधिकारी, ठाणे (कांदळवन),
मुंबई कांदळवन संधारण घटक

व.प.अ.ठा.कां.मुं.कां.सं.घ/जमिन/general letter/22-23

**वनपरिक्षेत्र अधिकारी, ठाणे (कांदळवन) मुंबई कांदळवन संधारण घटक, यांचे कार्यालय**
वनराज सोसा.शेजारी,फॉरेस्ट कॉलनी, हरी ओम नगर रोड,कोपरी, ठाणे (पुर्व)- 400 603
Email:rfommcubhiwandi@gmail.com

महाराष्ट्र वन विभाग

जा. क्र./ ठा.कां/तक्रार/521 /2022-23
ठाणे 400 603, दि. 07 /10/2022

प्रति,

मा.विभागीय वन अधिकारी,
मुंबई कांदळवन संधारण घटक

विषय:-संस्थेच्या मालकीच्या जमिनीतील कांदळवने नष्ट करून अवैधपणे बांधलेल्या सिमेंटचा रस्ता तत्काळ निष्कासित करून संबंधित व्यक्तिवर/ विकासकावर गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्याबाबत.

संदर्भ- 1. आपले कार्यालयाकडील पत्र क्र.जमिन/175/2022-23, दिनांक 21/04/2022.
2. आपले कार्यालयाकडील पत्र क्र.जमिन/378/2022-23, दिनांक 18/05/2022.
3. वनपाल ठाणे यांचेकडील पत्र क्र. व.ठा./71/2022-23, दि. 03/08/2022.

उपरोक्त विषयान्वये प्राप्त तक्रारी अर्जाचे अहवाल खालील दिलेल्या नमुन्यात सादर करीत आहोत.

**<u>तक्रारी अर्जाबाबत पाहणी केल्याचा अहवाल</u>**

1. मुळ तक्रारदाराचे नाव व पत्ता, फोन न केशवसृष्टी संस्था, पत्ता-उत्तन भाईंदर (प.), जि. ठाणे 401 106, फोन क्र 22 28450247/ 28452855.
2. स्थळाचे वर्णन:— मौजे उत्तन स.क्र. 184 (ड), 188 (ब), 190 (ब), रामरतन विद्यालय व केशवसृष्टी संस्था इमारत
3. तक्रारीचा तपशील:-मौजे उत्तन स.क्र. 184 (ड), 188 (ब), 190 (ब) केशवसृष्टी संस्था यांच्या मालकीची जागा असून या मालकीच्या जागेतून कांदळवनाची झाडे तोडून सिमेंटचा रस्ता तसेच भरती ओहोटीच्या प्रवाहाचा मार्ग केलेमुळे कांदळवनाचा झालेल्या ऱ्हासाबाबत.
4. स्थळाचे जी.पी.एस.रिडींग:-
   1. $19^{\circ}$ 15' 48" N व $72^{\circ}$ 48' 4" E
   2. $19^{\circ}$ 15' 50" N व $72^{\circ}$ 48' 3" E
5. Geo tag Photo- सहपत्रामध्ये जोडले आहे.
6. स्थळपंचनामा- सहपत्रामध्ये जोडले आहे.

तक्रार क्षेत्राचा वैधानिक दर्जा—

अ.) तक्रारीत नमूद क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र आहे का? असल्यास अधिसुचना क्र.-
तक्रारीतील नमुद क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र नाही.

ब.) सदरचे क्षेत्र बफर झोन मध्ये येते का ? असल्यास अंतर (मी.)-होय.
सदरचे क्षेत्र कांदळवनापासून ५० मीटर आतील बफर झोन मध्ये येत आहे.

क.) सदरचे क्षेत्र खाजगी कांदळवन क्षेत्र आहे का ? होय.

ड.) सदरचे क्षेत्र सरकारी क्षेत्र आहे का?
सदरचे क्षेत्र सरकारी क्षेत्र नाही.

7. सन 31 डिसेंबर 2005 रोजी MRSAC Map नुसार तक्रारीतील नमुद जागेवर कांदळवन होते का ?
सन 31 डिसेंबर 2005 रोजी MRSAC Map नुसार तक्रारीतील नमुद जागेवर तुरळक प्रमाणात काही ठिकाणी

ांदळवन दिसून येत आहे.

. सद्यास्थितीत नमुद जागेवर कांदळवन आहे किंवा कसे याबाबत सुस्पष्ट अभिप्राय—

सद्या नमुद जागेवर मौजे उत्तन स.क्र. 184 (ड), 188 (ब) मध्ये केशवसृष्टी या संस्थेच्या काही क्षेत्रावर कांदळवनाचे व कांदळवन सहयोगी झाडे दिसून आली व कांदळनाचा ऱ्हास करुन सिमेंटचा पक्का रस्ता बनविल्याचे दिसून आले.

9. अधिसुचित कांदळवन क्षेत्र असल्यास प्रथम गुन्हा नोंद केला आहे का?- नाही.

10. अधिसुचित कांदळवन क्षेत्रा व्यतिरीक्त क्षेत्र असल्यास संबधित यंत्रणेस लेखी कळविण्यात आले आहे का?
होय. मा तहसिलदार, मिरा भाईंदर यांना या कार्यालयाकडील पत्र क्र 496/2022 दिनांक 30/09/2022 अन्वये कळविण्यात आले आहे.

11. कार्यवाही कोणत्या विभागाने कार्यवाही करणे आवश्यक आहे.
मा. तहसिलदार मिरा-भाईंदर यांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

12. वनक्षेत्रपाल यांचा तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीचा स्वयंस्पष्ट अभिप्राय—
सदर तक्रारीमधील नमुद क्षेत्र हे अधिसुचित राखीव कांदळवन नाही. सदर क्षेत्रावर 2005 साली कांदळवन होते व सद्यस्थीतीत नमुद जागेवर कांदळवन दिसुन येत आहे. केशवसृष्टी या संस्थेच्या काही क्षेत्रावर कांदळवनाचे व कांदळवन सहयोगी झाडे दिसून आली व कांदळनाचा ऱ्हास करुन सिमेंटचा पक्का रस्ता बनविल्याचे दिसून आले

13. वनक्षेत्रपाल यांचा सदरची तक्रार निकाली काढावी किंवा कसे? याबाबात स्पष्ट अभिप्राय-
सदर तक्रारीमधील नमुद क्षेत्र हे अधिसुचित राखीव कांदळवन नाही. परंतु तक्रारीचे जी.पी.एस. रिडींग गुगल अर्थ वर तपासले असता सदरचे तक्रारप्राप्त क्षेत्रावर सन 31 डिसेंबर 2005 साली कांदळवन आहे. तसेच सद्यस्थितीत नमुद जागेवर कांदळवन आहे. सदर जागेवर सिमेंटचा पक्का रस्ता बनविल्याचे दिसून येत आहे. तरी सदर तक्रारी बाबत मा तहसिलदार, मिरा भाईंदर यांना या कार्यालयाकडील पत्र क्र 496/2022 दिनांक 30/09/2022 अन्वये कळविण्यात आले आहे. तरी सदरची तक्रार निकाली काढण्यास हरकत नाही.

(विक्रांत वामन खाडे)
वनपरिक्षेत्र अधिकारी, ठाणे (कांदळवन),
मुंबई कांदळवन संधारण घटक

पंचनामा

① श्री मुकेश शंकर पायपुते, वय वर्षे 32 धंदा नोकरी
रा. कळवा जि.ठाणे मोबाईल नं. 7506007374

② श्री महेश दत्तात्रय जाधव, वय वर्षे 48 धंदा नोकरी
रा. उत्तन, पालीबंदर ता.जि. ठाणे
मोबाईल नं 9819719592

आज रोजी दि 21/07/2022 रोजी आम्हा पंचाद
वन परिक्षेत्र अधिकारी ठाणे व वनपाल ठाणे, वनरक्षक कोपर
व उत्तन व श्री गोविंद डोलूका, रा. केशवसृष्टी उत्तन यां
बोलवल्यावरुन उत्तन येथील केशव सृष्टी या संस्थेने के
तक्रारीवरुन केशवसृष्टी यांच्या जागेत बेकायदेशीर पणे
कांदळवनाची झाडे तोडून मातीचा भराव करुन बेकायदेशी
कोणाचीही परवानगी न घेता सिमेंटचा पक्का रस्ता त
केलेल्या तक्रारीचा पंचनामा करण्याकामी आम्हा पंचास
विनंती केल्यावरुन आम्ही पंच या जागेची परिस्थीती
वस्तुस्थीतीनुसार प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहिल्या प्रमाणे
पंचमत लिहून देत आहोत ते खालील प्रमाणे

आम्ही पंच व वनपरिक्षेत्र अधिकारी ठाणे कांदळ
तसेच वनपाल ठाणे, वनरक्षक कोपरी व उत्तन तसेच त
दार श्री गोविंद डोलूका यांच्या समवेत मौजे उत्तन स.
184(3), 188(ब), 190(ब) या सर्वे नंबरच्या जागे
रस्ता बनविलेल्या ठीकाणी पायी चालत जाऊन पहा
केली असता तद्नंतर तक्रारदार श्री गोविंद डोलूका यांनी
पंचांच्या पहाणीच्या दरम्यान केशवसृष्टी या संस्थेच्या मा
जागेची संपुर्ण कागदपत्रे दाखविली असता सदरची
ही सं.नं 184(3), 188(ब), 190(ब) मौजे उत्तन केशव
सामाजीक संस्थेच्या मालकीचे असलेचे कागदपत्रावरुन दिस
येते तसेच आम्ही पंच व वनाधिकारी या वरील सर्वे नंब
मध्येच उभे असल्याची खात्री झाली.

सदर केलेल्या अनाधिकृत रस्त्याच्या तक्रारीच्या बरना
वरील चतु:सिमा वर्णन खालील प्रमाणे
① पूर्व दिशेला — कोपरा गाव

(ii) पश्चीम दिशेला – रामरतन विद्यालय
(iii) उत्तर दिशेला – केशव सृष्टी संस्था व इमारत
(iv) दक्षिण दिशेला – खाडी पात्र

तसेच आम्ही पंच व वन अधिकारी या अनाधिकृतपणे केलेल्या रस्त्याची पहाणी करत असतांना रस्त्याच्या सुरवातीलाच लोखंडी गेट (दरवाजा) बनवलेला दिसून आला तसेच त्याच्या सुरवातीलाच डांबर मीश्रित खडी टाकून रस्ता बनवलेला आला व पुढे जाऊन काही अंतरावरती सिमेंटचा पक्का रस्ता बनवलेला दिसुन आला त्याचे अंतर मोजले असता अंदाजे 300 मीटर लांबीचा असल्याचे दिसुन आले. तसेच सिमेंटचा पक्का रस्ता बनविलांना कांदळवनाची झाडे तोडुन, भराव करुन दलदलीच्या भागातुन बनविलेला आम्हा पंचास व वन अधिकाऱ्यांना दिसुन आला. या बनवलेल्या सिमेंटच्या रस्त्याला लागुन काही ठिकाणी रस्त्यामध्येच जेसीबिच्या मशीन। जेसीबिच्या ऑफिसीलानीच या कांदळवनाच्या जाती आम्हा पंचास व वन अधिकाऱ्यांना दिसुन आल्या. तसेच खारवा, कांदळ, भेंडी इत्यादी कांदळवन सहयोगी प्रजाती दिसुन आल्या. सदर रस्ता हा खाडीच्या पात्रातुन बनवलेला असून खाडी पात्र उत्तरेकडुन दक्षिणेकडे वहात असून. या खाडीपात्रात वेगळ्या प्रकारे कांदळवनाची झाडे व कांदळवन सहयोगी प्रजाती असल्याचे दिसुन आले हा बेकायदेशीर रस्ता बनविल्याने समुद्राचे भरती ओहोटीचे पाणी येण्या जाण्याचा प्रवाह बंद झाल्याचा आम्हा पंचास व वन अधिकाऱ्यांना दिसुन आला.

तसेच आम्हा पंचासमक्ष वन अधिकाऱ्यांनी श्री गोविंद केलुस्कर, व्यवस्थापक केशव सृष्टी उत्तम संस्था यांना हा रस्ता बनविताना आपली किंवा आपल्या संस्थेची, महानगर पालिकेची परवानगी घेतली होती का असे आम्हा पंचासमक्ष वन अधिकाऱ्यांनी विचारले असता या वरील रस्त्याला कोणतीही कोणाचीही परवानगी न घेता अनाधिकृतपणे, बेकायदेशीर आमच्या मालकीच्या हद्दीतुन बनविलेला आहे असे आम्हा पंचासमक्ष वनअधिकाऱ्यांना सांगितले तसेच हा केलेला रस्ता तोडण्यात यावा असा मागणी आम्हा पंचासमक्ष

वन अधिकाऱ्यांना केली.

आम्ही पंचासमक्ष सदर पहाणीच्या वेळी वनरक्षक उल्हन सदरच्याचे Geo Tag Photo व GPS रीडींग घेतले ते या प्रमा

① N 19° 15' 48" ② N 19° 15' 50"
E 72° 48' 4" E 72° 48' 3"

सदरचे क्षेत्र हे अधिसुचित राखीव कांदळवन क्षेत्र न
हे क्षेत्र खाजगी मालकीचे असलेचे समजते. हा सदर जा
कब्जेदार अमोल म्हात्रे रा कांदीवली (प.) यांनी त्यांच्या जाग
जाणे येण्यासाठी व चालु असलेल्या बांधकामासाठी वापर
असल्याचे आजु बाजुला चौकशी केली असता समजते

वर नमुद पंचनामा आम्ही पंचासमक्ष वनखात्याचे अ
व केशव सृष्टीचे व्यवस्थापक श्री गोविंद जेलुका यांच्या उप
धरना स्थळाच्या परीस्थीती व वस्तुस्थीतीनुसार जागेवर फि
फीरून पाहिल्याप्रमाणे लिहण्यात आला व पंचनामा लिहल
आम्हा सर्वांना मोठ्या आवाजात वाचुन दाखविला तो बरोब
असल्याची आम्हा पंचांची खात्री झालेवर आम्ही पंच
पंचनाम्यावर सह्या केल्या.

हा पंचनामा आज दिनांक 21 जुलै 2022 रोजी दु
02:00 वाजता सुरू करून 04.00 वाजता पुर्ण करण्यात आ


पंच सही
(सही)
① श्री मुकेश शंकर पायपुते

(सही)
② श्री महेश दत्तात्रय जाधव

समक्ष
(सही)
प्रकाश शंकर कुंभार
वनरक्षक, कोपरी

(सही)
एस. व्ही. मोरे
वनपाल शाखा (कांदळवन)

(सही)
एम. एस. गाढेकर
वनरक्षक उल्हने.









परिमंडळ वन अधिकारी
ठाणे, कांदळवन




परिमंडळ वन अधिकारी
ठाणे, कांदळवन








परिमंडळ वन अधिकारी
ठाणे, कांदळवन


keshavsrushti cement road
2022 Uttan, sarvey no. 186
Legend
keshav srushti cement road track
Life Spaces
uttan keshavsrushti
Life Spaces
keshavsrushti P3
P2
cement road P1
Google Earth
© 2022 Maxar Technologies
100 m
N




परिमंडळ वन अधिकारी
ठाणे, कांदळवन